
ऐक ना
- तेजल अपाले





## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट आहेत.

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.



# ऐक ना

तेजल दिलीपपंत अपाले

ई साहित्य प्रतिष्ठान





# ऐक ना


## लेखिका व चित्रकार :तेजल दिलीपपंत अपाले

संपर्क पत्ता .मु-पो .काकडा

ता .अचलपूर .

जि .अमरावती

मो .९९७५५८२६७१

मेल tejalapale@gmail.com


या पुस्तकातील लेखनाचे आणि चित्रांचे सर्व कायदेशीर हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे .तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.






# प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane. 400604.

www esahity. com

esahity@gmail. com

Whatsapp: 7710980841

APP : https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity.

www. esahitybooks

**प्रकाशन : १एप्रिल २०१८**



©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ईसाहित्य प्रतिष्ठानची परवानगी - घेणे आवश्यकआहे.





# मनोगत

नमस्कार वाचकहो ..हे माझं पहिलं पुस्तक आहे .याआधी मी आणि माझं लेखन माझ्यापुरतंच मर्यादेत होत .कधी वृत्तपत्रातून, कॉलेज च्या स्मरणिकेतून माझे लेख, कविता प्रसिद्ध झाल्या आहेत .पण आपणही पुस्तक लिहावं अशी सुप्त इच्छा मनात होती .मला मराठी वाचनाची आवड लहानपणापासूनच आहे म्हणून मी इंटरनेट वर वेगवेगळ्या साईट बघत होते आणि ई साहित्य या साईट चे काम बघून मी खूप प्रभावित झाले आणि त्यांना मेल पाठवला, आणि त्याच गोड फळ म्हणजे आज माझं पुस्तक आपल्यासमोर वाचायला उपलब्ध आहे .मी मनापासून ई साहित्य प्रतिष्ठानला खूप धन्यवाद देते त्यांनी माझ्या स्वप्नाला अस्तित्त्वात आणलं .त्यांच्या आधाराशिवाय हे शक्य नव्हतं .हे पुस्तक प्रकाशित होणं म्हणजे माझ्याबरोबर माझ्या कुटुंबाचं देखील स्वप्न होत .

आपली मराठी भाषा एवढी मधुर आहे कि ती कुणालापण आपलंसं करते . अगदी साधुसंतांच्या काळापासून साहित्याचा भला मोठा वारसा आपल्याला लाभला आहे .मला अभिमान आहे मी मराठी असल्याचा .या साहित्याच्या अफाट ज्ञानात माझे शब्द म्हणजे फुल न फुलाची पाकळी चे योगदान आहे .

हे पुस्तक आपल्याला कसं वाटलं ते जरूर कळवा .लेखनातील दोष दाखवणाऱ्या प्रतिक्रियांचे स्वागत आहे .

आपला अभिप्राय नक्की कळवा .

धन्यवाद .

तेजल दिलीपपंत अपाले

9975582671

अर्पणपत्रिका

आयुष्याच्या प्रत्येक वळणावर

माझ्यासोबत खंबीर पणे उभे राहणाऱ्या

माझ्या कुटुंबाला अर्पित

---तेजल दिलीपपंत अपाले





# ओळख



मी एक इंजिनीरिंग ची विद्यार्थिनी आहे. पण मराठी वाचनाची आवड अगदी लहापणापासून आहे. लहानपणी बरेच पुस्तके, कविता कादंबरी वाचल्या. शिवाजी सावंत यांचं लिखाण मला आवडत. एखादं ऐतिहासिक दृश्य समोर कसं उभं करायचं हे त्यांना चांगलं उमजलं आहे. मी लहानपणापासून कविता करते, मी माझी पहिली कविता ३री मध्ये असताना केली होती 'निळया अंबारीच्या खाली..

'अर्थातच ती बालिश होती पण आपणही काही लिहू शकतो याची मला तेव्हा जाणीव झाली होती. १०वी मध्ये असताना मी पहिली कथा लिहिली होती 'संघर्ष'. त्यानंतर लेख कविता किंवा एखादा विषय आवडला तर त्यावर लिहीत होते, पण लिखाणात सातत्य नव्हतं. पण मराठी, हिंदी च्या पेपर मध्ये मी लिहिलेल्या निबंधांचे नेहमी कौतुक व्हायचं. बरेचदा अव्वल क्रमांकही मिळवला.





लिखाणाबाबत माझं  एक स्वप्न आहे ते म्हणजे मला असं लिहायचं आहे जे आपल्यासारख्या साधारण माणसाच्या मनाचं ठाव घेईल. जे आपण सगळयांनी आपल्या

आयुष्यात अनुभवलं असेल, जगलं असेल. कारण शेवटी संवेदनशीलता सर्वात महत्त्वाची असते. हे माझं पाहिलं पुस्तक आहे. वाचकांचा भरघोस प्रतिसाद मिळाला तर असंच लिखाण सुरु राहील, आणखी नव्या जोमाने.

तेजल दिलीपपंत अपाले
मो. ९९७५५८२६७१






# ऐक

# ना





# ऐक ना..



कधी कळलं का रे तुला

आयुष्य म्हणजे काय?

प्रश्न हा खरा कि

नुसतेच चालणारे पाय ?

जन्म म्हणजे सुरवात

आणि मृत्यू हा शेवट

हे माहिती आहे सगळ्यांना

पण तरीही मनावर

भीतीचं का सावट?

तळहाताच्या फुलासारखं

जपतात न ते बालपण

असतात आईवडील

जे वेचतात कण न कण





घेणार मी उंच भरारी आकाशात, जेव्हा फुटतील मला पंख
सैरावैरा धावेल आणि चुंबून येईल क्षितिजाचं शिखर

अनेक आशा मनी, अपेक्षांचंही ओझं

आणि आयुष्य म्हणजे एक रंगीत स्वप्न

चालताना या ठरवून दिलेल्या वाटेवर

काही नागमोडी वळण आलं

आणि नव्या उमद्या प्रेमाची झलक दाखवून गेलं

शेवटी प्रेम म्हणजे आहे तरी काय?

कळली तर प्रीती नाहीतर प्रेत

कळलं तर स्वर्ग नाहीतर अखेर

थांबवलं बरेचदा स्वतःला जेव्हा मनात हा विचार आला..

केलं माझ्या मनासारखं तर काय म्हणतील चार लोक मला?



शोधतेय मी अजूनही त्या चार लोकांना पण.. .  उमजलं एक सत्य

गाठ त्यांची होणार मृत्यूशय्येच्या वाटेवर

कारण माझ्या देहामागे चार शब्द बोलण्यासाठी येणार तेच हे चार लोक..

त्यांनी  दिलं काय मला आणि मी त्यांच्यासाठी गमावलं कितीतरी..

कधी तोंडओळखही नाही झाली या लोकांशी

ज्यांच्यासाठी मी वाट बदलवली

कळलंच नाही मला माझी उंच उडी फक्त एक पावलांची ठरली

तरीही होत समाधान की  प्रश्नाची ऊत्तरे तर मिळाली

माझ्या मागे माझ्यासाठी बोलणारी चार माणसे आली

पण या सगळ्यांमध्ये मला काय हवं ते मिळालंच नाही

जिवंतपणी कधीच न बघितलेल्या

या चार माणसांसाठी मी स्वतः कधी जगलेच नाही

जाता येईल का परत त्या वळणावर मला,

जिथे मिळेल माझं जीवन मला?

कारण सहन होत नाही हे सारं आणि खोट्या हसण्याचे तृषार





मी जातंय निघून पण मन अजूनही घुटमळतंय
त्याच  नागमोडी वाटेवर
वाटतं निघावं इथून न धावत सुटावं त्या रस्त्यावर
पण नाही आहे ती वेळ आणि नाही आहे तो प्रवास

फक्त प्रश्नाची शिदोरी, चार शब्द आणि पश्चताप
सांग ना रे मला का आहे हि चौकट चार लोकांची
जी आयुष्याच्या शेवटी मला विचारते  "शेवटी आयुष्य म्हणजे काय?"







# मृत्यू

एक कटू सत्य .सर्वपरिचित पण तरीही तेवढंच भयानक .मनुष्य जन्म घेऊन या भूतलावर येतो आणि मृत्यू हा त्या जीवनाचा शेवट, वर्षानुवर्षे चालत आलेलं हे निसर्गाचं चक्र .वैज्ञानिक दृष्ट्या  साधं आणि सरळ .पण खरंच मृत्यू एवढा साधा असतो?

एखाद्याच्या जन्माने सगळीकडे आनंद पसरतो, शरीरातील नसानसात रोमांच संचारतोएक जीव लहानाचा .ष्य सुरु होणार असतकारण तिथे एक नवं आयु . बोबडं बोलून .मोठा होतो, धडपडत चालायला शिकतहे सगळं फक्त त्या जीवाशी . तर त्या लहा .मर्यादित नसतनाचं मोठं होण्याऱ्या जिवाबरोबर त्याच्या भोवतालचे लोकही ते सगळं जगत असताततत्याच्या लहानपणात तेही ल .हान होतात आणि पन्नाशीच्या वयातही पाच वर्षाचा असल्याचा अनुभव घेतातपण मृत्यू या . धड्पडलेलं लेकरू उठून पुन्हा उभं राहत पण मृत्यूनंतर .सगळ्याच्या विपरीत आहे जस .माणसाची सावलीही राहत नाहीं एका जन्माने त्याच्या भोवतालच्या आवडत्या व्यक्तींचा जन्म होतो तसेच एका मृत्यू ने त्याच्या आसपासच्या लोकांच्या भावनांचाही मृत्यू होतो .

पण शेवटी जन्म आणि मृत्यू ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत .जो जन्मला तो मरणारच .पण या दोहोंमधील जे अंतर आहे ते आयुष्य आहे .जेव्हा जन्म घेतो तेव्हा आपल्याकडे काहीच नसतं .ना शब्द ना ओळख, पण जगण्याची इच्छा आपल्याला सगळं काही देते. नाव, यश, आनंद, नाते आणि त्याचबरोर दुःख, अपयश सुद्धा .अनेक प्रयत्नांनंतर जेव्हा अपयश येतं तेव्हा आपल्याला मृत्यू सोपा वाटतो .अनेक दुःखांना जेव्हा समोर जावं लागत तेव्हा आपल्याला मृत्यू सोपा वाटतो .हि माणसाची मानसिकताच आहे .





पण आयुष्यच गणित समजलं तर फार सोपं आहे .फक्त आयुष्यात काय मिळवायचं आणि काय वजा करायचं ते मात्र कळायला हवं .एखाद्या गोष्टीसाठी शंभर वेळा प्रयत्न करूनही ती मिळत नसेल तर थांबायचं नाही कारण कदाचित एकशे एक वेळानंतर ती मिळणार असेलदुःख मिळालं म्हणून ! आपण श्वास घ्यायचं थांबत नाही तर मग प्रयत्न तरी का थांबवायचे .जीवनात कुठलीही गोष्ट मिळवायची असेल तर ती मिळवण्याच्या ध्यास स्वतःमध्ये असला पाहिजे .कावळ्यांनी कितीही ठरवलं तरी तो गरुडझेप घेऊ शकत नाही कारण आकाशाला गवसणी घालण्याची जिद्द गरुडाला मुळातच असते .

म्हणून कुठलीही गोष्ट मिळवायची असेल तर आधी स्वतःमध्ये तशी इच्छा जागृत व्हायला हवी .कारण आपण अंड्याला बाहेरून कितीतरी फूट म्हटलं तर ते फक्त फुटेल .





पण जर ते अंड स्वतः फुटलं तर त्यातून एक जीव बाहेर येतो हे आहे आयुष्यचं गणित .जोपर्यंत तुमचा श्वास चालू आहे तोपर्यंत तुमचे प्रयत्न चालू असायला हवे .जर प्रयत्न थांबले तर तो जिवंतपणी आलेला मृत्यू आहे .

ज्या लोकांमध्ये आपण वावरतो, पूर्ण आयुष्य घालवतो ते लोक मेल्यानंतर स्मशानात घेऊन जातात आणि ते प्रेत जाळतात .त्या जळणाऱ्या ज्वाला प्रेतावर आपलं अधिराज्य गाजवतात .आणि कवटी फुटली कि सारे नातेवाईक परत फिरतात . ज्या शरीराला आयुष्यभर आपण एवढं जपतो शेवटी ते राख होत आणि मागे उरतं ते फक्त आपलं नाव .म्हणून जगताना असंच जगा कि मृत्यूनंतरही तुमचं नाव जिवंत राहायला हवं .सतत प्रयत्न करा स्वतःला एवढं मोठं बनवा कि मृत्यूही तुम्हाला मारू शकणार नाही .आणि स्वतःला मोठं बनवताना नैतिकता जपा .कारण व्यक्ती तीच मोठी असते जिला भेटल्यानंतर कुणी स्वतःला लहान समजणार नाही .

मृत्यू हे पृथ्वीवरचं एक अपरिहार्य सत्य आहे .आपण मेहनत करतो कारण त्याच्या शेवटी यश असत, आपण यशावर प्रेम करतो म्हणजेच शेवटावर प्रेम करतो . त्यांचप्रमाणे जसं जीवनावर प्रेम करतो तसेच मृत्यूवरही करा म्हणजे आयुष्य आणखी सुंदर बनेल .आणि मृत्यू नंतर तुमचं केवळ नाव न राहता एक आठवण म्हणून नेहमी जिवंत राहील .





# मृगजळ

आयुष्य म्हणजे एक विस्तारलेले रान आहे

ऊन सावली च्या खेळांत लपलेलं सुख दुःखाचे कोड आहे

कधी शीतल कधी उष्ण, कधी सहन न होणाऱ्या झळा

आणि अचानक येणाऱ्या आल्हाददायक कळा

निसर्गाच्या बाहुपाशात बिलगून नात्यांचा गोडवा गात

बीज रोवून प्रीतीचे रंगांना फुलपाखरू देतंय साथ

उघडून डोळे इवले, मृगही बघतय सृष्टी

झोनझवणारा वारा आणि धावणारे पाय बदलवत आहे त्याची दृष्टी

बागडायला हवं त्यानं आणि आस्वाद घ्यावा जगण्याचा

पण नजर जाते क्षितिजा कडे, आणि ध्यास लागतो जिंकण्याचा

असंख्य धावणारे पाय, वाट जाते एकच

क्षणभंगुर ते सुख तरीही ते हवंच

होतो भास मृगजळाचा, बुद्धी होते स्थूल

नाती जातात विरून, कोमेजून जात नुकतंच उमलले फुल

चूक कि बरोबर यातलं अंतर आता कळत नाही,





कस्तुरी च्या शोधात स्वतः चा च शोध लागत नाही

धावत धावता पायही क्षीण झाले

एका आभासमुळे सारे जीवन कवडीमोल झाले .

आता मृत्यूही समोर येऊन थांबलाय, संगतीला कुणी नाही

अपेक्षा तरी कशी करू?

मृगजळा कडे जाताना मी मागे वळून बघितलंच नाही .







# चौकटीबाहेरच नातं

चौकटीबाहेरच नातं .... वाचून गोंधळायला होत नू ? हे कसलं नातं?ऐकलं तर नाही कधी!!आणि आलाही कुठला विचार  मनात तर तो केवळ नकारात्मक ....! नक्कीच काहीतरी अनैतिक किंवा समाजमान्य नसणारं नातं असेल. पण  नेमकं आहे तरी काय हे चौकटीबाहेरच नातं ?आणि ते खरंच इतकं वाईट आहे का?

आयुष्यात आई -वडील , भाऊ बहीण, मित्र मैत्रीण सगेसोयरे या नावाखाली न येणारी पण काही नाती या जगात असतात..जी अगदी हृदयाच्या कोपऱ्यात अलगद जपून ठेवली जातात. पण...हे नातं नेमकं कोणतं  हेच कळत नाही.तरीही सतत हवंहवंस वाटणार आणि तेच बनतं चौकटीबाहेरच नातं.

बरेचदा अश्या काही व्यक्ती आयष्यात येतात, ज्यांचा स्वभाव ,त्यांचं वागणं-बोलणं मनाला अगदी भावून जातं.त्यांचा सहवास आवडतो आणि सतत त्या व्यक्तीसोबत राहावंसं वाटत.  पण ते काय असत...?   'प्रेम'? नाही? पण ते प्रेम नसत असंही नाही.बरेचदा वैवाहिक व्यक्तींचा जीवनात पण असे प्रसंग येतात.मग त्याला काय म्हणायचं...?

खरं तर  चौकटीबाहेरच नातं हे या सगळ्या गोष्टीला भेदून जाणार पण अतिशय सुंदर अशी भावनिक गुंफण आहे. त्यात दोन व्यक्ती मनाने अगदी जवळ असतात. त्या नात्यात जिव्हाळा असतो,काळजी असते आणि राग देखील असतो. पण





म्हणून ती व्यक्ती 'पती' किंवा 'पत्नी' या नात्यांनीच सोबत राहावी अशी भावना देखील नसते, पण 'मित्र' किंवा 'मैत्रीण' या संकल्पनेपेक्षाही पढे गेलेली ती व्याख्या असते, पण फक्त 'मनाची'... पण तरीही ..एक मित्र म्हणून ती व्यक्ती सतत आणि आयष्यभर सोबत राहावी एवढीच माफक अपेक्षा! मग अशी अपेक्षा  असंन ..असं वाटणं हे चुकीचं आहे का?

या नात्यात वय नसतं.वयांमध्ये खूप अंतर असणाऱ्या व्यक्ती सुद्धा जवळ येऊ शकतात,फक्त विचार जुळायला हवेत आणि मनसुद्धा .मग जे नातं एवढं पवित्र आहे ,वासनेचा ज्याला गंधसद्धा नाही, केवळ आणि केवळ मनाची तारे जुळलेली आहेत..भेटीची ओढ आहे..सहवासाची आतुरता आहे..काळजीची साथ आहे..मग खरंच असं पवित्र नातं चौकटीबाहेरच आहे??आणि सामाजिक दृष्टया ते असेलही तरीसद्धा त्या नात्यात राहणाऱ्या त्या दोघांना ते हवंहवंसच असतं.

बरेचदा सामाजिक दडपणामुळे या नात्यात दुरावा येतो किंवा सवाात गहि प्रश्न म्हिजे ...लोक काय म्हणतील??या प्रश्नांमळे गोंधळुन जाऊन त्या व्यक्ती एकमेकांपासन दूर जातात आणि आपला चांगला मित्र  गमावून बसतात.हे नातंच असं आहे, दूर गेल्यांनतरसुद्धा मनाच्या कप्प्यात जपून ठेवलेलंच असतं.फारच कमी लोक असतील...अगदी बोटांवर मोजण्याइतपत जे आपल्या या सुंदर नात्याबद्दल कुणाजवळ बोलत असतील. पण हे वाचून त्यांच्या जुन्या पण गोड आठवणींना उजाळा नक्कीच मिळाला असेल.





हे एक असं नातं आहे,जे कधीच तोडून तुटत नाही. मग दूर जाणार तरी किती? जिथे मन जुळलेली आहेत तिथे त्यांना बुद्धीही दूर नेऊ शकत नाही.... पण काही कारणास्तव दुरावा आलाही तरी तर नातं मात्र शिंपल्यातला मोती जपावा अगदी तस जपलं जात आणि बनून जात चौकटीबाहेरच नातं..एक गोड आठवण ...







# स्त्री..

ती एक मूर्ती आहे

जगताना लागणारी स्पंदन आहे

असला देह आपल्याकडे जरी

तरी त्या देहाची ती मूर्तिकार आहे .

नऊ महिने उदरी ठेवून .

अगदी मरण यातना सोसून

या सप्तरंगी जगात आणणारी ती एक रचना आहे

बोट धरून आयुष्याचे धडे गिरवत

मोठं करणारी ती शाळा आहे .

ममतेचा झरा, वात्सल्याचा लळा

लीच्या एवढा नाही कुणाला कळवळा

'आई' या दोन शब्दात साठवली तिची महिमा

देवांनी माझ्यासाठी पाठवलेली देवाचाच एक भाग आहे . ..

येता संकट माझ्यावर, एक हात असतो पाठीवर

आधार असतो  मला तिचा, आयुष्याच्या वाटेवर





रेशीम धाग्यामध्ये गुंफते ती एक सुरेख गुंफण

करुणेचं अन प्रेमाचं बांधते त्याला कुंपण

'बहीण'अशी, थोर आहे भाग्य

लहान असो कि मोठी, ती एक मायेची पाखर आहे .

मनाची होते घालमेल

येता तारुण्याच्या उंबरठ्यावर

स्पर्श तिचा होतो ठेवुनी हात हातावर

योग्य मार्ग दाखवून दिशा देते ती

प्रेमाची नवी व्याख्या सांगून जाते ती

काळीज माझं, ठोका तिचा

असं नवीन नातं  जन्माला येतं .

आयुष्यात नवीन रंग भरायला तीच येणं असतं .

प्रेमापासून बनलेली ती 'प्रेयसी'

माझ्यासाठी परिणामाचीही पर्वा न करणारी ती एक ज्योत आहे

तुझं येणं अणि माझं होऊन जाणं

नकळत हृदयाच्या कोपऱ्यात हळुवार बघणं





माझा होतो मी, कधी तुझ्या स्वाधीन झालो??

तुझ्याशिवाय आता माझं अस्तित्व नाही, इतका मी तुझा झालो!!

माझ्या आसवांना बांध तू  घातला
स्वतः मात्र खडतर प्रवास केला ..
सात जन्माची वचन तर दोघांनीही घेतली
तू तर माझ्यासाठी जीव च ओवाळून टाकला
'पत्नी' आहेस तू . ..तुझ्यात बसलंय माझं घर
तुझ्याविना माझं जगणंच अर्थहीन आहे .

शरीर एक, रूप अनेक

बंध एक, नाती अनेक

कधी आई बनून तर कधी प्रेयसी
कधी मैत्रीन  बनून तर कधी पत्नी
ती असते सतत माझ्यासोबत
मला सावरण्यासाठी .. .
मला ठेचल्यावर अश्रू ढाळण्यासाठी
कधी दुर्गा तर कधी चंडिका ..





प्रसंगी रणरागिणीही बनते ..

माझ्यावरच्या संकटांना  माझ्याआधी तो सामोर जाते,

तू देवाची एक सुंदर आणि मूर्तिमंत आकृती आहे ..

आणि तुझ्याशिवाय मी अपूर्ण आहे





# 'अर्थ प्रेमाचा'

नाही असं काही जिवनी, ज्याला अंत नाही,,
नश्वर आहे प्राण आणि आत्मा तोही नाही ..
भावनांचा खेळ त्याला नात्याचं कुंपण
आणि शेवटी . .आठवणींचं संगोपन

एक सुंदर फुल प्रेमाचं . ..ज्याला कोमजण्याचा श्राप नाही
दोन जीवांचं मिलन . ..त्याला अंतर नाही
प्रेमाच्या धबधब्यात उसांडुन वाहतात
एक क्षणात अवघे आयुष्य जगतात ..

न जातपात-, न धर्माचा बांध
उत्कंठ प्रेम न आयुष्यभराची साथ
पण सुशिक्षित असलेल्या अज्ञानी  समाजाला जरा समज कमी आहे ..
प्रेमासारख्या पवित्र नात्याला त्यांनी दिलेली अनैतिकतेची जोड आहे
दडपू पाहतात ते मन . .ज्यांनी धाडस केलं प्रेम करायचं .. ..
विसरतात ते हे कारण आहे त्यांचा कमकुवतपणा लपवण्याचं ..





साऱ्या जगतावर मात करायची ताकद प्रेमात आहे . ..

पण प्रेमाच्या खऱ्या अथपासूनच जग वंचित आहे . ..

एक असं नातं जिव्हाळ्याचं, ममतेचा आणि काळजीच

हक्काचं आणि  बांधिलकीचं

मिळवण्याचा हेतू नाही आणि स्वार्थाचा गंधही

फक्त आनंद घ्यायचा न आनंद वाटायचं

बाकी मात्र काहीच नाही  .. ..







# औपचारिकतेचा मुखवटा

आजचं युग म्हणजे स्पर्धेचं युग .यशाच्या मागे धावताना या युगात अनेक गोष्टी कालबाह्य होत आहेत .प्रत्येकाला या जीवघेण्या स्पर्धेत टिकून राहायचं आहे आणि त्यासाठी स्वतःला सिद्ध करताना माणूस हा माणूस न राहता एक यंत्रमानव झाला आहे .त्यामुळे साहजिकच माणसातली मानसिकताही बदलली आहे, पण समाजात वावरतांना केवळ पैसा किंवा पद असून चालत नाही, सोबत असावी लागते ती 'नैतिकता'. पण या स्मार्ट युगात जूनं जाऊन सगळंच नवीन आलंय, 'पत्र' जाऊन मोबाईल आले, मग मेल, skype इत्यादी .अगदी सगळं काही स्मार्ट झालंय .आणि याचाच परिणाम म्हणजे नैतिकतेचं स्मार्ट रूप 'औपचारिकता'.

आपल्या संस्कृतीची, मूल्यांची जोपासना करणे, या धकाधकीच्या जीवनात जगतांना त्या मूल्यांना अध्यात्माची, माणुसकीची झालर देणे ही आहे नैतिकता . अगदीच सोप्या भाषेत जर नैतिकता आणि औपचारिकता या दोहोंमधील फरक सांगायचं असेल तर तो म्हणजे माणसाने माणसासोबत माणसासारखी दिलेली वागणूक म्हणजे नैतिकता आणि आपण मुळात जसे नाहीच केवळ वेळेवर आणलेला नैतिकतेचा आव म्हणजे औपचारिकता .खूप फरक आहे या दोन मानसिकतेमध्ये .

आपल्या देशाला संस्कृतीचा खूप मोठा वारसा लाभला आहे .अगदी वैदिक काळामध्ये म्हणजे इ, स, पूर्व १५०० च्या काळात नैतिक मु ६०० -ल्ये नमूद केलेली आहेत .त्यानंतर बौद्धिक काळातही नैतिक मूल्यांना महत्वाचे स्थान दिलेले आहे आणि अर्थातच मानवी जीवनामध्ये नतिक मूल्यांचं स्थान अग्रगण्य च असायला हवं .कारण





जगताना जरी  मूलभूत गरजा म्हणजे अन्न, वस्त्र, निवारा यांची गरज असली तरी मानसिक जोपासनेसाठी नैतिकता देखील  तेवढीच महत्वाची आहे .कारण त्याची गरज आपल्याला पदोपदी भासते .

वाईट वेळ कधीच कुणाला सांगून येत नाही .प्रत्येक कठीण  प्रसंगी आर्थिक मदतच लागते अशी  बाब नसते .गरज असते ती आपुलकीची, प्रेमाची म्हणजेच नैतिकतेची .

मध्यंतरी वाचण्यात आलं होतं आणि वाचून डोळयाच्या कडा नकळत ओलावल्या होत्या. एक मध्यमवर्गीय कुटुंब .पती .मुले २पत्नी आणि -दोन्ही मुलांच्या शिक्षणासाठी त्या दाम्पत्याने स्वतःला अगदी झोकून दिल होत .मुलेही हुशार आणि मेहनती होती .मोठा मुलगा शिष्यवृत्ती मिळवून परदेशी गेला .आणि काहीच काळात त्याने लहान भावालाही आपल्यासोबत बोलावून घेतलं .दोघेही लठ्ठ  पगाराची नोकरी करत होते न चुकता दर महिन्याला आई .वडिलांना पैसे पाठवीत-इकडे या दाम्पत्यांच्या शेजारी एक मुलगा राहत होता .साधारण त्यांच्या मुलाच्याच व्हायचा . पण शिक्षणाअभावी छोटे मोठे कामे करायचा .या दाम्पत्याला काहीही गरज पडली तर तो लगेच त्यांच्या मदतीला यायचा आणि भरपूर काळजीही घ्यायचा .त्यांची मुले रोज किंवा वेळ मिळाला तशी त्यांना फोन करायची, विडिओ कॉल वरून बोलायची . सगळं काही व्यवस्थित सुरु होत आणि अचानक त्यांच्या वडिलांचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला .त्या माऊलीला तर आभाळ कोसळलेलं .दोन्ही मुलांना कळवण्यात आलं .मोठा मुलगा आला आणि परंपरेनुसार त्याने वडिलांच्या पार्थिवाला अग्नी दिला .शोकसभेत आलेल्या एक व्यक्तीने  त्याला लहान भावाबद्दल विचारलं कि तो का नाही आला? तर त्यावर मोठा भाऊ  बोलला “नाही, तो आईच्या वेळी येणार आहे”.





त्याच हे भावनाहीन उत्तर ऐकून त्यांची आई शून्यातच गेली .स्वतःला सावरून तिने त्या शेजारच्या मुलाला जवळ बोलावलं आणि पोटच्या पोराला उद्देशून म्हटलं 'बाळ, यांना सांग, स्वतःच्या आईवडिलांच्या अंत्यसंस्क-ाराला आळीपाळीने यावं एवढं त्यांना बंधन नाही हो .माझ्या चितेला अग्नी तूच देणार .आजपासून तूच माझा मुलगा . '

सगळ्या विचारांना हादरवून टाकणारीही घटना खूप प्रश्न समोर मांडते . नेमकं कोण जवळच होत?दर महिन्याला पैसे पाठवणारे मुलं कि प्रत्येक हाकेला ओ देणारा तो शेजारचा मुलगा?

या घटनेवरून कळतं कि औपचारिकता आणि नैतिकता म्हणजे काय आणि त्यांचं आयुष्यात काय स्थान आहे .केवळ कर्तव्य म्हणून ती मुलं आईवडिलांना पैसे - .ना जराही वेळ नव्हतापाठवत होती पण त्यांच्यासाठी त्यांत्या उतार वयात खरं तर त्यांना त्यांच्या सहवासाची जास्त गरज होती पण त्यांची गरज त्यांच्या मुलांना कळलीच  नाही .त्यांनी पाळली ती फक्त औपचारिकता .याउलट त्या शेजारच्या मुलाची त्या दाम्पत्याला काहीही आर्थिक मदत नव्हती पण खंबीर आधार होता .तो त्यांची मायेनी काळजी घ्यायचा आणि जगताना याची जास्त गरज असते .

जगतांना पैसा हा लागतोच हि बाब अतिशय योग्य आहे कारण त्याशिवाय भौतिक सुखांचा आनंद घेता येत नाही .पण पैसा देऊन नातीहि विकत घेता येत नाहीत आणि मानसिक सुखही .विज्ञानाच्या या युगात सगळं जग जवळ आलंय पण माणसं दुरावलीत .

औपचारिकताही बाब वाटते तेवढी सहज नाही .





'पाण्यातला मासा झोप घेई कैसा? जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे'

जोपर्यंत या औपचारिकतेचा आपण बळी होत नाही तोपर्यंत त्याचं गांभीर्य उमजण कठीणचआहे .कारण त्या माउलीने जे अनुभवलं ते आपल्यासारख्यांना कळणार नाही . पण लोकांनी आपल्यासोबत जसं वागावं अशी आपली इच्छा असते तसेच आपणही त्यांच्याशी वागावं .कारण 'पेराल तेच उगवेल'.

आपण वेळ नाही हि सबब पुढे करून आपली मूल्ये, संस्कार विसरत चाललो आहे .हे सगळं वेळीच बदलायला हवं नाहीतर नैतिकता तर कालबाह्य होतच आहे नंतर औपचारिकताही राहणार नाही .आणि तो दिवस दूर नसेल जेव्हा अंत्यसंस्काराला लोक विडिओ कॉल वरून उपस्थित राहतील .







# मनकवळा

एक असं स्वप्न . ..मणी बिंबलेलं ..

एक असं नातं ..हृदयात कोरलेलं ..

एक असा साथी ..जो असेल हळवा ..

मिळेल का असा मला . ..माझा 'मनकवळा'?

होईल जरा धाकधूक ..ह्रदयातलं गुपित ओठांवर खुलताना

नकळत देईल का तो साथ माझ्या त्या शब्दांना ?

दबा धरून बसलेल्या माझ्या अश्रूंना .. .

तोडेल का तो बांध माझ्या दुःखांचा?

विलक्षण सोनेरी क्षणांचा सडा . ..

उधळेल  का माझ्यावर ..माझा मनकवळा?

लागते ठेच, रक्ताळतो पाय .

पण पायातून वाहणाऱ्या लाल अग्नीपेक्षा दाह असतो एकटेपणाचा ..

संगीतातले सूरही नाहीत आणि इंद्रधनूतले रंगही ..

क्षणिक मिळणाऱ्या सुखावरहीची पडलाय पडदा . .

घेऊन चैतन्याची पहाट ..गवसेल का मला माझा मनकवळा?





लढून साऱ्या  जगताशी . .घेऊन हातात हाती . .

शब्दांविना जुळलेली नाती ..प्रेमाच्या उभारून चार भिंती ..

सप्तजन्माची शाश्वती .

फक्त मी अन माझा सांगाती . .. ..

घेरून आहे तारुण्याच्या कडा . ..

कधी भेटेल मला माझा मनकवळा?







# ई साहित्य प्रतिष्ठान

**मराठी** भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणाऱ्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार दोनहजार प्रती छापल्या जात. पाच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी.

आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच दहा लाख वाचकांपर्यंत जातं. वर्षाला चाळीसेक लाख डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर फ़ॉरवर्ड करतात. व्हट्स अप, ई मेल, ऍप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायलीत. सुसाट सुटलित. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठिवरच्या प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगाने सुसाट सुटलेल्या मराठीच्या वेगाला आता कोणी थांबवू शकत नाही.

या धूमधडक क्रांतीत सामिल व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही फ़क्त दहा वाचक आणा. ते शंभर आणतील. आणि ते दहाहजार. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला फ़ुकट पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत. आपल्याला टिव्ही पेपर ची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवू.